सकाळ

# उपराजधानीत उरली फक्त नऊ टक्के हिरवळ!

## संशोधनातून उघड : नीरीतील जैवविविधतेमुळे तीन अंश तापमान कमी

■ कौस्तुभ चव्हाण :
सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ३१ : हिरवे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नागपुरात मोठ्या प्रमाणात सिमेंटचे जंगल उभारले जात आहे. त्यामुळे येथील वृक्षांवर संक्रांत आली असून पक्ष्यांचे निवारे नष्ट झाले आहेत. शहरात आता केवळ ७ ते ९ टक्केच हिरवळ उरली असल्याची धक्कादायक माहिती नीरीच्या संशोधनातून पुढे आली आहे.

राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (नीरी) यांच्या ४६ हेक्टर परिसरातील समृद्ध वृक्षसंपदेमुळे परिसरातील तापमान इतर भागांच्या तुलनेत सुमारे ३ अंश सेल्सिअसने कमी राहत असल्याचे एका ताज्या संशोधनातून उघड झाले आहे. नीरीच्या या विस्तृत कॅम्पसमध्ये एकूण १,७४४ झाडे आणि तब्बल ८३ विविध वृक्षप्रजातींची नोंद करण्यात आली आहे. यात कडुनिंब, पिवळा गुलमोहर यांसारख्या अनेक स्थानिक आणि दर्जेदार प्रजातींचा समावेश आहे. ही झाडे मोठ्या प्रमाणावर कार्बन शोषून घेत पर्यावरण संवर्धनात मोलाचा हातभार लावत आहेत. या दाट आणि वैविध्यपूर्ण वृक्षसंपदेमुळे येथील सूक्ष्म हवामानात सकारात्मक बदल झाला आहे. उष्णतेच्या काळातही नागरिकांना व संशोधकांना मोठा दिलासा मिळत आहे.




**नागपूरः** नीरी परिसरात असलेली घनदाट वृक्षसंपदा.

अशा प्रकारच्या पर्यावरणपूरक कॅम्पसना 'ओईसीएम' (इतर प्रभावी क्षेत्र-आधारित संवर्धन उपाय) म्हणून मान्यता देण्याची गरज व्यक्त होत आहे. जर अशा ठिकाणांना ओईसीएमचा दर्जा मिळाला, तर देशातील अधिकृत संरक्षित क्षेत्रांना मोठा आधार मिळू शकेल आणि शहरी जैवविविधता संवर्धनाला अधिक बळ मिळेल, असा विश्वास पर्यावरण अभ्यासकांनी व्यक्त केला आहे. शहरातील हिरवळीची तूट भरून काढण्यात नीरी, महाराजबाग आणि विद्यापीठ परिसरासारखे विस्तीर्ण कॅम्पस महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

### १०० उद्यानांमध्ये निरीक्षण सुरू

■ नीरी कॅम्पसमध्ये सुरक्षित जमीन मालकी, कमी मानवी हस्तक्षेप आणि दीर्घकालीन जैवविविधता देखरेख व्यवस्था आहे. यामुळे इतर संस्थांनाही संवर्धनात योगदान देता येईल आणि २०३० पर्यंत ३० टक्के भूभाग संरक्षणाच्या जागतिक उद्दिष्टाला बळ देण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. या संशोधनात पाच संशोधकांनी सहभाग घेतला. यात एस. सरण्या, मनू थॉमस, राधिका सूद, रूपाली नयाल आणि डॉ. शालिनी ध्यानी यांचा समावेश आहे. हे संशोधन गेल्या १२ ते १३ वर्षांपासून सुरू आहे. संशोधन केवळ नीरी परिसराचेच नव्हे, तर शहरातील १०० हून अधिक उद्यानांचेही केले जात आहे.

Nagpur, Nagpur-Today
01/08/2026 Page No. 3